या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी
नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई
वडवणी केज परळी
पाटोदा शिरूर कासार
धारूर आष्टी माजलगाव
इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार १ जूले २०२४ | अंक२०४ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# त्याच्या बापाच्या डोळ्यात अश्रू नाही, रक्त निघतं, मनोज जरांगे पाटील शिवसंग्रामच्या मंचावर भावनिक



## जरांगे यांचा भुजबळांवर निशाणा

“येवलावाला अंतरवालीजवळ उपोषण सोडवायला आला. हा जातीवाद नाही का? तुम्ही एकत्र आल्यानंतर आम्ही काय बोललो नाही. तुम्ही लोक आम्हाला अडवायला लागला. मराठ्यांच्या नादी लागू नका. टांगे उलटेपालटे होतील. या मराठ्यांनी मनावर घेतलं तर काहीही होवू शकतं. आम्हीच 50 ते 51 टक्के आहोत. मंत्री छगन भुजबळ यांच्यासारखा भाऊ एक एकरात भावाचं नाव आलं तरी वावर देत नाही. न्यायाधीश आणि मंत्रिमंडळ माझ्याकडे आले. त्यांना कुणालाचं आरक्षण कळत नव्हतं. सगेसोयऱ्यांची व्याख्या आमच्याप्रमाणे असणार आहे. सगासोयरे आम्हाला समजलं नाही का?”, असा सवाल मनोज जरांगे यांनी केला.

**विशेष /प्रतिनिधी**

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज शिवसंग्रामच्या मंचावरुन भाषण केलं. या भाषणात मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर भूमिका मांडली. मनोज जरांगे यांनी यावेळी मंत्री छगन भुजबळ यांच्यावरही निशाणा साधला. “गोरगरिबांना आरक्षण मिळालं पाहिजे. आरक्षणासाठी 400 ते 500 जणांचं बलिदान गेलं. एकही बलिदान वाया जाऊ द्यायचं नाही. ही आपली जबाबदारी आहे. आपण आता हटायचं नाही. कधीही वेळ आली आणि संकट आलं तरी मराठ्यांनी मागे हटायचं नाही. शंभर टक्के मराठा मोठा करायचा आहे. मी जातीवाद केलेला नाही. माझ्या समाजाला आरक्षण हवं आहे. ते स्वप्न घेवून मी रस्त्यावर उतरलोय. मराठा जातीवादाला जबाबदार नाही. आपले शिवसंग्रामचे प्रमुख विनायक मेटे यांनी आरक्षणासाठी बलिदान दिलेलं आहे. स्वातंत्र्याच्यानंतर ओबीसींना आरक्षण मिळालं. आम्ही 150 वर्षापासून आरक्षण मागत आहोत. ओबीसी नेत्यांना मात्र हे समजत नाही”, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. “आमची जमीन असताना त्या सातबारावरचं नाव खोडा असं तुमचं म्हणणं आहे. 57 लाख नोंदी मिळाल्या. मराठ्यांच्या त्या नोंदी रद्द करायला सांगतात. मग जातीवादी कोण करतंय? आम्ही मराठा ओबीसीतूनचं आरक्षण घेणार. तुम्हाला मिळालं आहे. आम्ही तुमचं घेत नाही. आम्ही दीडशे वर्षांपूर्वीचे आहे ते आम्ही घेतोय. आमचं लेकरू एक मार्कांने हुकते. त्याच्या बापाच्या डोळ्यात अश्रू नाही, रक्त निघतं. हे तुम्हाला कळणार नाही”, असं मनोज जरांगे म्हणाले. “आमचं लेकरं गळ्याला फास लावून घेत आहे. आमच्या भावना तुम्हाला कळणार नाही. तुमच्या लेकरांना आम्ही आपलं मानतो. तुम्ही आमच्या लेकरांना आपलं मानत नाहीत. तुम्हाला तुमचा विचार बदलायचा असेल तर बदला. पण मी माझे मत बदलणार नाही”, असं जरांगे म्हणाले.

## सोयगावात तहसील समोर रेशन दुकानदाराचे धरणे आंदोलन



**सोयगाव / प्रतिनिधी**

सोयगाव , पुरवठा विभागाच्या गोदामातून धान्य बोमोजुन मिळावे , कमिशनची रक्कम तात्काळ वाढ करून दरमहा खात्यात जमा करावी, आदी मागण्यासाठी तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या वतीने गुरुवारी दुपारी बारा वाजता तहसील समोर धरणे आंदोलन करण्यात आले , यावेळी घोषणाबाजी करण्यात आली जवळपास चार तास आंदोलन केल्यानंतर विविध मागण्याचे निवेदन तहसीलदारांना रेगाडलेल्या ऑनलाइन कोडीचे कामे तात्काळ करावी धान्य बरोबर बारदान घ्यावा आदी मागण्याचा समावेश आहे, सुभाष चौधरी, भगवान पवार, साधू नाथ चव्हाण, सांडू राठोड , विजय चौधरी , शेषमल जाधव, गोकुळ चव्हाण, सय्यद अजीम, अनिता बाई राठोड, गुलाब सिंग राजपुत , लक्ष्मण पवार, आदी हजर होते ,

## सावळदबारा येथे जिओ टावर बनले डोकेदुखी टॉवर उभे नावाला रेंज नाही गावाला

**सोयगाव / प्रतिनिधी**

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा गावाला जिओ टावर झाले डोकेदुखी टॉवर उभे नावाला रेंज नाही गावाला अशातला प्रकार झाला असून येथील जिओचे सिम धारक खूप वैतागले आहेत सावळदबारा परिसराला लागून असलेले बारा गावाचे सावळदबारा मुख्यालय असल्यामुळे नेहमीच येते लोकांची वर्दळ असते बँका शाळा दवाखाना पोलीस स्टेशन पोस्ट ऑफिस महा-ई-सेवा केंद्र या कामासाठी नागरिकांची येथे प्रमुख उपस्थिती असते पण येथे जिओचे मोठे नेटवर्क असल्यामुळे जवळपास सर्व स्तरावर जिओ नेटवर्क चा वापर केला जातो पण गेले कित्येक दिवसापासून जिओ नेटवर्क लोकांची डोकेदुखी बनलेले आहे अचानकच टावर जाणे फोन सुरू असताना अचानक कट होणे फोर



जी सुविधा असल्यावर टुजी रेंज मिळणे वापर कमी आणि बिल जास्त भरने शेजारी शेजारी फोन असून फोन न लागणे अनेक कारणामुळे ग्राहकांना नाहकचा त्रास सहन करावा लागत आहे जिओ या कंपनीच्या सिम कार्ड वापर करणाऱ्या लोकांना जास्त त्रास होत आहे याचा सर्वाधिक फटका व्यावसायिकांना झाला आहे मोबाईलला रेंज नसणे डेटा स्पीड कमी असणे अशा वारंवार अडचणी येत असतात त्यामुळे याची तक्रार करायची कुठे?असा प्रश्न सर्वसामान्यांकडून विचारला जात आहे दवाखाना शाळा कॉलेज पोस्ट ऑफिस बँका याचा नेटवर्कर नसल्याने ताप सहन करावा लागतो त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी दखल घेऊन सेवा सुरळीत कराव्यात अशी मागणी जोर धरत आहे

## लोणावळ्यातील धबधब्यात एकाच कुटुंबातील पाच जण वाहून गेले, तिघांचे मृतदेह मिळाले, दोघांचा शोध सुरु

**प्रतिनिधी** पावसाळा सुरु होताच पुणे आणि परिसरात असणाऱ्या पर्यटन स्थळांवर पर्यटकांची गर्दी होत आहेत. अनेक पर्यटक पर्यटनासाठी डोंगर, दऱ्या अन् धबधबे असणाऱ्या ठिकाणी जातात. या ठिकाणी धाडस करणे कधी चांगलेच महागात पडते. पुण्याजवळ असणाऱ्या लोणावळ्यामध्ये भुशी डॅम्पच्या बॅकवॉटरमधील धबधब्यावर मोठी दुर्घटना घडली. धबधब्यावर एकाच कुटुंबातील पाच जण वाहून गेल्याची घटना रविवारी दुपारी तीनच्या सुमारास घडली होती. त्यातील तिघांचे मृतदेह सापडले असून दोघांचा शोध सुरु आहे. वाहून गेलेल्या पाच जणांमध्ये चार अल्पवयीन मुले आहेत. कशी घडली घटनालोणावळ्यातील भुशी डॅम्प सध्या ओवरफ्लो झाला आहे. त्या ठिकाणी पर्यटकांची चांगलीच गर्दी झाली आहे. रविवारी अन्सारी परिवार भुशी डॅम्पवर पर्यटनासाठी आला होता. जंगलातून येणाऱ्या बॅक वॉटरवरील धबधब्यावर अन्सारी परिवार पाण्याचा आनंद घेत होता. तेव्हा धबधब्यात असताना अचानक पाण्याचा प्रवाह वाढला. त्यात दहाजण अडकले होते. त्या पैकी पाच जणांना बाहेर काढण्यात यश आले तर पाच जण पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. वाहून गेलेल्यामध्ये साहिस्ता लियाकत अन्सारी (वय- 36), अमिमा सलमान उर्फ आदिल अन्सारी (वय- 13), उमेरा सलमान उर्फ आदिल अन्सारी (वय- 8) यांचा समावेश आहे. या घटनेत त्या तिघांचा मृत्यू झाला आहे. त्यांचे मृतदेह सापडले आहेत. तसेच अदनान अन्सारी (वय- 4), मारिया अन्सारी (वय- 9)

## भारताने वर्ल्डकप जिंकलेल्या शहरात चक्रीवादळ, टीम इंडिया अडकली,

टी20 विश्वकप विजेता भारतीय टीम चक्रीवादळामुळे अडकली आहे. ज्या बारबाडोस शहरात विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना झाला त्या शहरात चक्रीवादळ आले आहे. यामुळे भारतीय खेळाडू हॉटेलमध्येच अडकले आहे. सोमवारीच टीम इंडियाला बारबाडोस शहरातून न्यूयॉर्क शहरात पोहचणार होती. परंतु खराब वातावरणामुळे त्याचे विमान रद्द करावे लगाले. विमानतळ बंद ठेवण्यात आले आहे. आता खेळाडूंना आणण्यासाठी भारतीय क्रिकेक नियामक मंडळ (बीसीसीआय) विशेष विमान पाठवणार आहे. हवामान सुधारल्यानंतर बारबाडोस विमानतळावरील कामकाज सुरु होणार आहे. त्यानंतर भारतीय संघ एका विशेष चार्टर्ड विमानाने थेट दिल्लीला येणार आहे.

# लग्ना पुर्वीच्या प्रियकराच्या संगनमताने विवाहितेचा विनयभंग ;पती वर चाकुने हल्ला.!

**माजलगाव/प्रतिनिधी**

लग्ना पुर्वी च्या प्रियकराच्या संगनमताने ५ जणांनी विवाहितेचा विनयभंग करुन तीच्या पतीवर चाकुने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना माजलगाव शहरात घडली. या प्रकरणी पिडीत महिलेन माजलगाव शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरुन सदर २२वर्षीय पिडीत महिला माजलगाव तालुक्यातील वाघोरा,ता.माजलगाव ह.मु.जिजामाता नगर माजलगाव येथील रहिवाशी असुन लग्ना पुर्वी प्रकरणातली आरोपी पांडुरंग शिंदे रा.घळाटवाडी,ता.माजलगाव हा प्रियकर होता पण त्यानंतर तीचे दुसऱ्या व्यक्ती सोबत लग्न झाले होते. सदर पिडीत महिला माजलगाव शहरातील जिजामाता नगर येथे पती सोबत संसार करीत आहे पण पांडुरंग शिंदे हा नेहमीच गल्लीत येऊन छेडछाड करत होता. आणि त्याच्या संगनमताने २७जून रोजीच्या रात्री ९ वा.च्या दरम्यान प्रकरणातली आरोपीं नामे शिवप्रसाद शिंदे,महादेव बाबर,परशुराम सावंत,अण्णासाहेब मोरे व एक अनओळखी हे पिडीत महिलेच्या घरासमोर आले होते आणि त्यांनी पांड्या आला पांड्या असे म्हणत चिडवत होते. यावर पिडीतेचे पती घरा बाहेर गेले त्यांच्या घरासमोर थांबु नका असे म्हणताच नमुद नामे आरोपींनी त्यांच्या उजव्या हाताच्या अंगठ्यावर चाकुने वार करून गंभीर जखमी केले. हि घटना पाहिल्यावर पिडीत महिला आली आणि भांडणाची सोडवा-सोडवी करत असताना तीच्या खांद्या वरील टॉप फाडुन तीला लज्जा वाटेल असे कृत्य केले. अशा फिर्यादी वरुन उल्लेखीत नामे आरोपीं विरोधात भादंवी.कलम १४३,१४७,१४९,३५४,३२३,३२४,५०४,५०६,३४प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले असुन पुढिल तपास पोह. तोटेवाड यांच्या कडे आहे.

कविता

## मुखी नाम यावे

विठ्ठल विठ्ठल । मुखी नाम यावे ।
चित्ती माझ्या व्हावे । स्थानापन्न ।।

देह नाशिवंत । नको मोह याचा ।
नको असत्याचा । मार्ग मज ।।

अहंकारातून । मज मुक्त कर ।
पाप माझे हर । पांडुरंगा ।।

पंढरीचे सुख । येथेची मिळावे ।
दान आज द्यावे । पामरास ।।

विश्व कल्याणार्थ । कार्य मज घडो ।
सर्वथा नावडो । राग लोभ ।।

नको अवगुण । नको वैरभाव ।
पैलतीर नाव । जाऊ देत ।।

दीन नको कोणी । नको कोणी राव ।
दिसो समभाव । निरंतर ।।

नदी व्हावी शुध्द । जीवन देण्यास ।
दु:ख हरण्यास । पोशिंद्याचे ।।

अजू बाळ तुझा । तुज देतो हाक ।
मिटवून टाक । वैरभाव ।।

©®शब्दसखा -
अजय रमेश चव्हाण
तरनोळी
ता.दारव्हा, जि.यवतमाळ
मो.8805836207

# साहेब, आम्ही तुम्हाला गिफ्ट देणार आहोत: ; विनायक मेटेंच्या जयंती दिनी पत्नीचं भावनिक भाषण

### ज्योती मेटेंचा कुणाला इशारा?

विनायक मेटेसाहेब आम्ही तुम्हाला गिफ्ट देणार आहोत. साहेब तुमचे आमच्यावर आशीर्वाद आहेत. महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांचा शिवसंग्राम कडून पाच लाख रुपयांचा अपघात विमा उतरविण्यात आला आहे. जो येईल ते माझ्या सोबत असेल.. जे येणार नाहीत त्यांनी ठरवावं. शिवसंग्राम पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे कान टोचले. प्रदेशाध्यक्ष तानाजी शिंदे यांची कार्यक्रमाला पाठ फिरविली आहे. त्यांनाच अनुसरून ज्योति मेटे यांनी हा इशारा दिला आहे. आजारी असल्याचे सांगत तानाजी शिंदे यांनी कार्यक्रमाला येणं टाळलं आहे. त्यांना ज्योती मेटे यांनी इशारा दिला आहे.



दिवंगत नेते विनायक मेटे यांची आज 61 वी जयंती आहे. या निमित्ताने बीडमध्ये अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं. यंदाच्या कार्यक्रमाला राज्यातील कोणत्याही पुढाऱ्यांना निमंत्रण देण्यात आले नाही. व्यासपीठावरील बॅनरवर मनोज जरांगे पाटील यांच्यासह ज्योती मेटे आणि शिवसंग्रामच्या महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांचे फोटो लावण्यात आले आहेत. या अभिवादन कार्यक्रमाच्या व्यासपीठावर पहिल्यांदाच मनोज जरांगे आणि ज्योती मेटे एका व्यासपीठावर पाहायला मिळाले. यावेळी शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती ज्योती मेटे यांनी उपस्थितांना संबोधित केलं. वाढदिवसाच्या कार्यक्रमांची आठवणदरवर्षी साहेबांचा वाढदिवस व्हायचा. मी खाली बसून कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवायची. जवळपास 22 वर्षे हा प्रवास होता. मात्र दुर्दैवाने आज मला व्यासपीठावर येवून तुम्हाला बोलावे लागतंय. समाजात साहेबांनी चांगुलपणा पेरलेला आहे म्हणून कार्यक्रम सुरु असताना पाऊस आला आहे. आपल्या पतीबद्दल भूतकाळात जावून बोलणे हे कुठल्याही महिलेला आनंद देणारं नसतं. शेवटच्या श्वासापर्यंत ते समाजासाठी कमा करत होते. म्हणूनच आम्ही साहेबांची जयंती ही कृतज्ञता सेवा म्हणून साजरी केली आहे, असं ज्योती मेटे म्हणाल्या.विनायक मेटे साहेबांची कल्पकता आणि दूरदृष्टी प्रखर होती. बीड मधील एकाही लोकप्रतिनिधींनी विकासाकडे लक्ष दिले नाही. आपल्याला प्रस्थापिविरुद्धात संघर्ष करायचं आहे. साहेबांनी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही. ग्रामपंचायत, कृषी उत्पन्न बाजार समितीत शिवसंग्रामला मोठे यश मिळाले आहे. आपण सर्व एकत्र येवून साहेबांची स्वप्नपूर्ती करूयात, असं म्हणत ज्योती मेटे यांनी शिवसंग्राम पक्षाच्या कार्यकर्त्यांना काम करण्यासाठी ऊर्जा दिली, असं त्यांनी म्हटलं.

# शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी घावी , राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार मागणी

**सोयगाव / प्रतिनिधी**
, जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळावी यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ( शरद पवार गट ) तर्फे प्रदेश अध्यक्ष , जयवंत पाटील राजेश टोपे यांच्या नेतृत्वात छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय आयुक्त कार्यालय वर 26 जुनं रोजी मोर्चा काढण्यात येणार आहे या मोर्चाच्या कार्यस्थळासाठी जिल्हाध्यक्ष पांडुरंग तायडे पाटील हे संपूर्ण जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी



करून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेत आहेत , सोयगाव तालुक्यातील सोयगाव , गलवाडा निंबायती , बहुलखेडा , वरठाण , गोंदेगाव , बनोटी मौलाई , या भागात राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष, पांडुरंग तायडे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाणी करून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या यावेळी त्याच्यावर सम नेत राष्ट्रवादी नेते शख, शफिक, तालुका अध्यक्ष , इंद्रजीत सोळुके , शहर अध्यक्ष , रवींद्र काळे , चंद्रकांत काळे दीपक देशमुख, सुधीर पठाडे , कृष्णा चुनघरे पाटील , युवक शहर अध्यक्ष अजय नेर पगारे , सूर्यभान पाटील कडूबा पाटील व संतोष राजपूत , आदी कार्यकर्ते होते सोयगाव येथील मोहरदनाला व गोगडी परिसरातील शेतकरी अर्जुन कोरडे दत्तात्रेय मोहन अरुण सोहनी , काळे राजेंद्र काळे, शेतमजूर महिला सोबत जिल्हाध्यक्ष, पांडुरंग तायडे पाटील यांनी हितगुज करीत अडचणी जाणून घेतल्या

# रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन...

**माजलगाव/प्रतिनिधी**
माजलगाव रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या वतीने दिनांक ०१ जुलै २०२४ रोजी भव्य रक्तदान शिबीर व वृक्षरोपंन कार्यक्रम माजलगाव शहरातील देशपांडे हॉस्पिटल समता कॉलनी माजलगाव येथे आयोजित करण्यात आलेले आहे.

तरी माजलगाव शहरातील व माजलगाव परिसरातील नागरिकांना सदरील कार्यक्रमात आवर्जून सहभाग नोंदवावा असे आवाहन रोटरी क्लब ऑफ माजलगाव चे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री मंगलनाथ मल्टिस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक



ॲड.रवींद्र कानडे व सचिव सौ. लता जोशी यांनी केले आहे.

रोटरी क्लब ऑफ माजलगाव च्या माध्यमातून वर्षभरामध्ये विविध समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन प्रामुख्याने होत असते. सण २०२४-२५ करीता रोटरी क्लब ऑफ माजलगाव च्या अध्यक्षपदी श्री रवींद्र कानडे यांची नुकतीच नियुक्ती झाली असून लवकरच पदग्रहण सोहळा संपन्न होणार आहे.

त्यांच्या अध्यक्षीय कार्यकाळामधील हा पहिला कार्यक्रम असून येत्या वर्षभरामध्ये माजलगाव शहरातील व परिसरातील नागरिक करिता विविध समाज उपयोगी कार्यक्रम राबवण्यात येणार असल्याचे रवीन्द्र कानडे यांनी सांगीतले.

## आजचे राशी भविष्य 1 July 2024 : या राशीच्या लोकांचे आईशी होतील विनाकारण मतभेद

ज्योतिषशास्त्रात (Astrology) जन्मकुंडलींद्वारे वेगवेगळ्या कालखंडांबद्दल भाकीतं केली जातात. दैनंदिन राशीभविष्य हे रोजच्या घडामोडींचे अंदाज देते, तर साप्ताहिक, मासिक आणि वार्षिक राशीभविष्य यामध्ये अनुक्रमे येता आठवडा, महिना आणि वर्षाचा अंदाज असतो. दैनिक राशिफल (Horoscope Today 1 July 2024) हे ग्रह-नक्षत्रांच्या हालचालीवर आधारित एक भविष्यवाणी आहे, ज्यामध्ये सर्व राशींचे (मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धनु, मकर, कुंभ आणि मीन) तपशीलवार वर्णन केले आहे. ही कुंडली काढताना ग्रह-नक्षत्रांसह पंचांगाच्या समीकरणाचे विश्लेषण केले जाते. दैनंदिन राशीभविष्य तुम्हाला नोकरी, व्यवसाय, व्यवहार, कुटुंब आणि मित्रांसोबतचे संबंध, आरोग्य आणि दिवसभरातील शुभ-अशुभ घटनांचे भाकीत देते.

# कुणबी प्रमाणपत्र व एस. ई. बी. सी. प्रमाणपत्र जलद गतीने वितरित करा

## माजलगाव सकल मराठा समाजाची मागणी

**माजलगाव/प्रतिनिधी**

- तालुक्यातील ज्या मराठा समाजाच्या कुणबी नोंदी सापडले आहेत त्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया अतिशय संथ गतीने चालू आहे. सध्या शैक्षणिक वर्ष चालू झाले असून यासाठी कुणबी जात प्रमाणपत्र व एस. ई. बी. सी. प्रमाणपत्र लागतात ते प्रमाणपत्र जलद गतीने वितरित करावे अशी मागणी माजलगाव सकल मराठा समाजाच्या वतीने उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना निवेदनाद्वारे केली आहे. संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आंदोलनाला यश मिळाल्याने कुणबी नोंदी सापडलेल्या मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यास सुरुवात झाली होती. परंतु गेल्या काही दिवसापासून माजलगाव तालुक्यातील मराठा समाजाच्या बांधवांना कुणबी जात प्रमाणपत्र व एस. ई. बी. सी. प्रमाणपत्र जलद गतीने मिळत नाहीत .सध्या बारावी व नीट परीक्षेचा निकाल लागल्यामुळे विद्यार्थ्यांना वैद्यकीय अभियांत्रिकी व इतर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी कुणबी जात प्रमाणपत्र व मराठा जातीचे एस.ई.बी.सी. प्रमाणपत्राची आवश्यकता लागते परंतु माजलगाव कार्यालयाकडून



प्रमाणपत्राचे अतिशय संत गतीने वितरण केले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ लागले आहे. ज्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राची तातडीने आवश्यकता आहे त्यांच्याकडून त्यांची आर्थिक लूट संबंधित विभागाकडून होत असून आर्थिक व्यवहार करून प्रमाणपत्र दिले जात असल्याचेही काही ठिकाणी प्रकार झाल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे माजलगाव येथील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने कुणबी जात प्रमाणपत्र व एस. ई. बी. सी. प्रमाणपत्र जलद गतीने वितरित करावे अशी मागणी उपविभागीय कार्यालय माजलगाव यांना माजलगाव सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदनाद्वारे केली आहे.

## या भाज्या तुम्ही ओळखल्या का? आदिवासी कुटुंबासाठी ठरत आहेत वरदान



**प्रतिनिधी**

उद्योगधंद्यांमध्ये नोकऱ्या उपलब्ध नसल्याने बेरोजगारीत वाढ झाली आहे. वाढत्या महागाईमुळे कंबरडे मोडल्याने अतिरिक्त उत्पन्नाच्या शोधात असलेल्या ग्रामीण भागातील आदिवासींना रानमेव्याच्या विक्रीतून रोजगाराचा मार्ग सापडला आहे. भातशेतीच्या कामातून वेळ काढत कुटुंबाचा रहाटगाडा हाकण्यासाठी पावसाळ्यात जंगलात उगवणारी शेवळी, करडू, कोळी भाजी, बांबूची शिन, माटभाजी, दिंडे आणि खापरा सारख्या रानभाज्यांची विक्री केली जात आहे. रानभाज्यांचसोबतच गावरान कोंबडे, चिंबोऱ्या आणि खेकडे विक्रीतून आदिवासी महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. शनिवार आणि रविवारच्या सुट्टीच्या दिवशी पालघर तालुक्यातील पर्यटन स्थळांकडे जाणारे आणि महामार्गालगत बसून रानभाज्यांची विक्री केली जात आहे. कुटुंबाच्या उत्पन्नात हातभार लावण्यासाठी लहानगे सुट्टीच्या दिवशी रानमेव्याच्या विक्रीसाठी पालकांना मदत करताना दिसून येत आहेत. पावसाळ्यात हाताला काम नसल्याने कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी नवीन मार्ग शोधले जात आहेत. रानभाज्यांच्या विक्रीतून चांगले उत्पन्न मिळत असल्याने आदिवासी कुटुंबे रान भाज्यांच्या विक्रीकडे वळत आहेत. मान्सुन बरसण्यास सुरुवात होताच जंगलात रान भाज्या उगवण्यास सुरुवात होते. रान भाज्यांबाबत उत्तम ज्ञान आणि कष्ट करण्याची तयारी असल्याले ग्रामीण भागातील आदिवासी बांधव जंगल पालथे घालून रानभाज्या शोधून आणतात.

## , सोयगाव शहरासह तालुक्यातील गलवाडा, वेताळवाडी, जंगला तांडा, व फर्दापूर तांडा येथील जवळपास १० कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे उदघाटन

## राज्याचे पणन व अल्पसंख्याक विकास मंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले.




**सोयगाव/प्रतिनिधी**

सोयगाव , दि 30 , रविवारी रोजी , ना, अब्दुल सतार , यांच्या पुढाकाराने गलवाडा गावासाठी 3 कोटी 70 लाख, वेताळवाडी 1 कोटी 52 लाख, जंगला तांडा गावासाठी 75 लाख, फर्दापूर तांडा साठी 32 लाख तर सोयगाव शहरातील विविध विकास कामांसाठी जवळपास 4 कोटी असे सुमारे 10 कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. उद्घाटन झालेल्या कामांमध्ये गावंतर्गत भूमिगत गटार, रस्ते, पेव्हर ब्लॉक बसविणे, पथदिवे बसविणे, सामाजिक सभागृह, शादिखाना, रस्त्याचे खडीकरण, मजबुतीकरण, पाणंद रस्ते विकास आदी विकास कामांसह सोयगाव येथील पाणी पुरवठा योजना कामांचा यात समावेश आहे. दरम्यान ना. अब्दुल सत्तार यांनी यावेळी सोयगाव येथील विविध शासकीय इमारतींच्या सुरू असलेल्या कामांची पाहणी करून विकास कामांचा आढावा घेतला. सोयगावच्या विकासासाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सोयगाव कारांच्या वतीने ना. अब्दुल सत्तार यांचा भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख प्रभाकर आबा काळे, नगराध्यक्षा आशाबी तडवी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती दारासिंग चव्हाण, माजी जि. प. सदस्य गोपीचंद जाधव, नितीन बोरसे, नगर पंचायततील शिवसेना गटनेता अक्षय काळे, शिवसेना शहरप्रमुख संतोष बोडखे, ॲड योगेश पाटील, मोतीराम पंडित, नगरसेवक कादिर शहा, हर्षल काळे, राजू दुतोंडे, शेख रऊफ, किशोर मापारी, नारायण धनगाव, गजानन कुडके, भगवान जोहरे ,संदीप चौधरी ,अशोक खेडकर, संदीप सुरडकर जंगलातांडा येथील बाबूसेट चव्हाण, वसंत राठोड, हिरा चव्हाण, रमेश चव्हाण आदिंसह नगरसेवक ,अधिकारी, पदाधिकारी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वाढती महागाई परवडेना , शहरातील व तालुक्यातील नागरिकेही वळले कडधान्याकडे भाजीपाल्याचे दर गगनाला , सर्वसामान्यांचा खिशाला चाप

**सोयगाव. /. प्रतिनिधी.**

सोयगावयंदाच्यावर्षीपडलेल्याकडधान्चचेऊनव वाढत्या तापमानामुळे भाजीपाला दिला याची चांगली झळ बसली आहे याच्यात प्रभाव म्हणून काम तर गगनाला भिडले असून मंगळवारच्या बाजारात गावरान सफरचंदला मागे टाकले 160 रूपये प्रति किलो असा भाव खाल्ला आहे याशिवाय इतर भाजीपाल्याचे दर देखील वधलेलयाचे दिसून आले याही वर्षी उन्हाळ्यात तापमानाने 43 अंशपयेत पारा पावला होता त्यातच मागील वर्षी झालेल्या पर्यंत पावसाळ्यामुळे बहुतास जलसाठे कोरडे पडले होते यामुळे यंदा बऱ्याच ठिकाणी नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी पाण्याच्या टँकरने अवलंबून राहावे लागले दरम्यान पाण्याने इतके दूभीक्ष पडल्याने भाजीपाल्याचे क्षेत्र देखील फळे ज्यांच्याकडे थोडेफार पाणी होते , असे आहे भाजीपाल्याचे दर , मंगळवारच्या भाजी बाजारात ग्राहकांनी गवार विक्री होते 160 रुपये हिरवी मिरची, 160 रुपये , फुल



गोबी फ्लावर 160,रुपये , कोथिंबीर 20 0 रूपये , टोमॅटो 120 रुपये किलो, पालक 80 रुपये किलो, वांगी 80 रुपये किलो, कांदे पन्नास रुपये किलो, मेथी चाळीस रुपये किलो, शिमला मिरची 80 रुपये किलो, प्रती दराने किलो खरेदी केली या दर पत्रकामुळे गुहणीचे बजेट काही प्रमाणात कोमल कोमलले असून सध्या भाजीपाला खरेदी करताना महिला वर्गाकडून आखडता घेतला जात आहे , सफरचंद नाही टाकले गावराने मागे , फळांमध्ये सफरचंद एकशे वीस रुपये दराने विक्री होत असताना गवार मात्र 160 रुपये प्रति किलोने विक्री झाल्याने गावरान आणि सफरचंदला मागे टाकल्याचे दिसून येत होते याशिवाय आंब्याचे सरासरी मागणी असणाऱ्या लिस्ट वनाचे दर देखील 80 ते 120 रुपये प्रति किलो दरम्यान विक्री होत असताना मंगळवारच्या भाजी बाजारात बहुतेक भाजीपाल्यांच्या दराने फळांना मागे सोडले, उशिरा तिच्या बँकेतून भाजीपाल्याची शेती करणे वर्ष भूमीवर पावसाळ्याच्या ऐन तोंडावर भाजीपाल्याची भाव गगनाला भिडले

## सोयगाव तालुक्यात सावळदबारा येथे वीज पडल्याने दोन जनावरे ठार ... शेतकरी वासुदेव खडके यांचे अंदाजे एक लाख रुपये किंमतीचे जनावरे ठार

**सोयगाव / प्रतिनिधी**

सोयगाव , सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे काल रात्री झालेल्या विजेच्या कडकडाटासह पाऊस कोसळल्याने शेतकरी वासुदेव खडके यांचा गाय गोठा गावाबाहेर असल्याने तिथे त्यांची जनावरे बांधली होती समोरच्या एका झाडावर वीज कोसळून दोन जनावरे एक मोठी गाय व एक मोठा बैल हे दोन जनावरे दगावले यामुळे शेतकऱ्याचे खूप मोठे नुकसान झाले आहे अगोदरच आस्मानी संकट व त्यामध्ये हे नैसर्गिक संकट शेतकऱ्यांनी तेव्हा कधी न भरून निघणारे हे




नुकसान आज या शेतकऱ्याची झाले आहे तेव्हा त्या नैसर्गिक आपत्तीचा काहीतरी मोबदला शासनाने द्यावा अशी शेतकरी वर्गात चर्चा आहे वीस पडल्या बाबत प्राथमिक माहिती महसूल विभाग व पशुवैद्यकीय विभागाला देण्यात आलेली आहे तरी शासनाने याची दखल घेऊन शेतकरी वासुदेव खडके त्या जनावरांचा त्वरित पंचनामा करून योग्य ती नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी परिसरात होत आहे

## शासनाच्या परिपत्रकाला केराची टोपली बंद पशुवैद्यकीय दवाखान्यामुळे पाळीव जनावरांची गैरसोय..

**सोयगाव / प्रतिनिधी**

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील पशुवैदकीय दवाखाना आठवड्यातून दोन दिवस मंगळवार गुरुवार चालु राहिल असे शासनाचे पत्र २८/५/२०२४ रोजी निघाले तरीही स्थानिक पशुवैद्यकीय दवाखाना २श्रेणी एक महिना उलटूनही शासनाच्या परिपत्रकाची अंमलबजावणी झाली नाही केंद्रीय ग्राहक संरक्षण समिती चे संस्थापक अध्यक्ष एडवोकेट जावेद मिर्झा यांच्या पाठ पुराव्यामुळे जिल्हा स्तरावरुन तात्पुरत्या स्वरूपावर दोन दिवसाचे आदेश काढूनही अंमलबजावणी झाली नाही ग्रामस्थांच्या पशुधनाची उपचारा अभावी हेळसांड होत असल्याची तक्रार जिल्हा समितीवर केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हा ग्राहक




संरक्षण परिषद अशासकीय सदस्य अन्वर अली, अमोल जैन, अन्वर शेख विभागीय कार्याध्यक्ष रहीम पठाण यांचा प्रयत्नाला यश आले. परंतु केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे विभागीय अध्यक्ष रहीम पठाण व केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे सोयगाव तालुका अध्यक्ष शामका प्रदीप चव्हाण पत्रकार सुनील चोरमले व गावकरी शेख रियाज शेख गफार फिरोज खान ज्ञानेश्वर मानकर भीमराव शेळके राजू गावडे यांनी पशुवैदकीय दवाखाना सावळदबारा दि.२७/६/२०२४ वार गुरुवार रोजी भेट दिली असता बंद असल्याचे दिसून आले. अजिंठा डोंगर रांगेत वसलेले सावळदबारा अति दुर्गम भागासाठी हा श्रेणी २ दवाखाना असताना तो बंद का आहे. शेतकरी व आदिवासीं लोकांकडे मोठ्या प्रमाणात गाई, म्हशी, शेळ्या आहेत. येथे साथीचे रोग तसेच वन्य प्राण्यांकडून हल्ले झाल्याच्या घटना घडत असतात. यामुळे दवाखाना व डॉक्टर उपलब्ध असणे गरजेचे आहे. वरिष्ठ या बातमीची दखल घेतील का

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे



# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे धर्मवीर २ चित्रपटात मोठ्या पडद्यावर दिसणार? सचिन पिळगावकरांनी सस्पेन्स वाढवला




शिवनेचे दिवंगत ज्येष्ठ नेते आनंद दिघे यांच्या आयुष्यावर आधारित सिनेमा 'धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे' याने मागच्या वर्षी प्रेक्षकांचा मनात अधिराज्य गाजवलं. आता या 'धर्मवीर' सिनेमाचा नवा भाग म्हणजेच 'धर्मवीर २' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाला आहे. दिग्दर्शक प्रवीण तरडे दिग्दर्शित आणि मंगेश देसाई निर्मित, प्रसाद ओकच्या अभिन्याने नटलेला धर्मावीर २ चा पोस्टर लाँच कार्यक्रमात आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं शासकीय निवासस्थान असलेल्या 'वर्षा' बंगल्यावर पार पडला. या कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र भूषण अशोक सराफ, ज्येष्ठ दिग्दर्शक सचिन पिळगावकर, ज्येष्ठ दिग्दर्शक महेश कोठारे उपस्थित होते. या कार्यक्रमाला बॉलिवूडचा अभिनेता बॉबी देओलची विशेष उपस्थिती बघायला मिळाली. या कार्यक्रमात सचिन पिळगावकर यांनी केलेल्या वक्तव्यामुळे या चित्रपटाबाबतची उत्सुक्ता आणखी शिगेला पोहोचली आहे. अभिनेता मंगेश देसाई यांनी सुरुवातीला भूमिका मांडली. "एकनाथ शिंदे साहेबांनी शपथ घेऊन दोन वर्ष पूर्ण झाली. ते पुढील दहा वर्ष मुख्यमंत्री राहावेत. अशी बाप्पा चरणी प्रार्थना करतो. धर्मवीर 2 साहेबांच्या हिंदुत्वाची गोष्ट असं सिनेमाचं नाव असेल. धर्मवीर 2 साहेबांच्या हिंदुत्वाची गोष्ट असेल. हा चित्रपट मराठी आणि हिंदी दोन्ही भाषेत 9 ऑगस्टला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे", असं मंगेश देसाई यावेळी म्हणाले. हिंदुत्वाशी गद्दारी करणाऱ्यांना क्षमा नाही, अशी टॅगलाईन चित्रपटाच्या पोस्टरवर आहे.

## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मोफत पास योजनेचा सोयगाव येथे शुभारंभ

**सोयगाव / प्रतिनिधी**

* सथानिक नॅशनल मराठी विद्यालयात सोयगाव बस आगाराच्या वतीने अहिल्याबाई होळकर मोफत पास योजने अंतर्गत मुलींना मोफत बस पासेस चे वितरण करण्यात आले. सोयगाव , नवीन वर्षातील पहिल्या सत्रातील शाळा आता सुरु झालेल्या आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एस.टी.च्या माध्यमातून 66% इतकी सवलत दिली आहे. म्हणजे केवळ 33% रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. त्याचप्रमाणे शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई



होळकर योजने अंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व मुलींना मोफत एस. टी. पासचे वितरण केले जाते.

विद्यार्थी-विद्यार्थिनींना आता एस. टी.च्या पास केंद्रावर रांगेत उभे राहण्याची आवश्यकता नाही. यामुळे विद्यार्थी व पालक यांचा वेळ वाया जाणार नाही. असे मत यावेळी आगार प्रमुख विजय काळवणे यांनी व्यक्त केले. सदर योजनेचा लाभ सोयगाव तालुक्यातील सर्व शाळा,महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घ्यावा व बस आगारास सहकार्य करावे असे मत यावेळी मुख्याध्यापक अमजद पठाण यांनी व्यक्त केले.* याप्रसंगी विद्यार्थ्यांना पासेस व शैक्षणिकसाहित्यवाटपकरण्यातआले. यावेळी स्थानक प्रमुख सतीश अंभोरे,आगार लेखापाल कृष्णा कावळे, सतिष पाटील, ज्ञानेश्वर वाडेकर,समाधान जाधव,विनोद जाधव,पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते योगेश बोखारे,आबा बाविस्कर. आदिसह पोपटराव साखळे, भाऊसाहेब सिरसाठ, पंकजकुमार साखरे,निलेश बावस्कर,ज्ञानेश्वर पांडव,नितीन पाटील,अक्षय पवार,रामेश्वर चौधरी, शेख जाकीर,संजय बोरसे आदिसह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पिसे यांनी तर आभार भगवान पाटील यांनी मांडले.

## सोयगाव , फदोपुर तांडा ते वरखेडी रस्त्याचे डांबरीकरण निकृष्ट ,, ठेकेदाराचे पितळ उघडे

सोयगाव / प्रतिनिधी सोयगाव. तालुक्यातील फदोपुर तांडा ते वरखेडी व धनवट गावांना जोडणाऱ्या डांबरीकरण रस्त्यांचे काम निकृष्ट व दजोही झाल्याने पावसाळा लागणयापुवी हा रस्ता जागोजागी खड्डे मत झाला आहे , जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातुन फदोपुर तांडा ते वरखेडी व धनवट या तीन गावाच्या साईसाठी नादुरुस्ता रस्ताचे डांबरीकरण करण्यासाठी लाखांचे रुपये मजुरी करण्यात आले होते मात्र ठेकेदाराकडुन दिवसपुवी रस्ता तयार ही केला मात्र महीणनयाभरापुवी तयार करण्यात आलेला रस्त्याला जागोजागी खड्डे पडले आहेत या कामात ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लागया बांधण्याचे पितळ उघडे पडले आहे , फदोपुर ते वाकोद रसतावरील वाघुर नदीवरील पुल पाडणे व नवीन पुल उभारण्याचे काम सुरू करण्यात येणार आहे त्यासाठी जामनेर, जळगाव मार्गांवरील वाकोद , वरखेडा तांडा , फदोपुर तांडा मागें छत्रपती संभाजी नगर साठी जाणाऱ्या अनेक छोट्या मोठया सहानाची वदेळ वाढली आहे या रस्त्याचे फक्त तीस दिवसांपुर्वी ठेकेदाराने धातुमातुर काम केले असल्याने रस्त्यावर अनेक ठिकाणीं रस्ता उघडून गेला असल्यानचे दिसुन येत आहे

# जातीचा अंत करणे हिच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिकवण - विजय साळवे

## स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न -

**माजलगाव : ( प्रतिनिधी )** जाती जातीत तेढ निर्माण करण्यापेक्षा जाती अंताची लढाई करण्याची शिकवण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला दिली असल्याचे प्रतिपादन स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या कोअर कमिटी सदस्य व तालुका पदाधिकारी यांच्या महत्त्वपूर्ण बैठकीत बोलतांना विजय साळवे यांनी केले. स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या कोअर कमिटी सदस्य व तालुका पदाधिकारी यांची महत्त्वपूर्ण बैठक संस्थापक अध्यक्ष विजय साळवे यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील व्यंकटेश हॉटेल येथे संपन्न झाली. बीड लोकसभा निवडणुकी नंतर सर्वात पहिली बैठक स्वाभिमानी रिपब्लिक सेनेची झाली असून निवडणुकीत बजरंग सोनवणे यांना जाहीर पाठिंबा दिला व त्यांच्या विजय झाल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. भारतीय राज्यघटना बदलण्याचा मनसुबा देशातील जातीयवादी शक्तीचा होता त्यांना रोखण्यासाठी स्वाभिमानी



कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला त्याबद्दल प्रथम सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन विजय साळवे यांनी केले प्रसंगी लवूळ येथील प्रसिद्ध व्यापारी बालासाहेब शिंदे यांच्यासह धम्मानंद गावडे , शेख अर्शद , राहुल मस्के , चंद्रकांत टाकणकार यांची स्वाभिमानी रिपब्लिक सेनेच्या कोर कमिटी सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली. बीड जिल्ह्यात लोकसभेच्या निवडणुकीनंतर मराठा ओबीसी असा वाद निर्माण झाल्यामुळे माणसा माणसात दरी निर्माण होत असून राजकीय पक्षांच्या स्वार्थी भूमिकेमुळे समाजात घातक परिस्थिती होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती अंताची लढाई सुरू केली व आम्ही त्यांचे सैनिक आहोत म्हणून आम्ही आणि मराठा ओबीसी दलित मुस्लिम आदिवासी सर्वांना समता बंधुभाव मैत्रीचा संदेश देऊन एकता निर्माण करण्याचे काम करणार आहोत जे लोक जातीयवादाला खतपाणी घालतात त्यांना त्यांची जागा दाखवल्या शिवाय स्वस्त बसणार नाही. सर्व जाती धर्मांच्या लोकांना आम्ही न्याय मिळवून देण्याचे काम करीत असताना स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेत सर्व जाती धर्माच्या कार्यकर्त्यांचे स्वागत केले जाईल आवाहन विजय साळवे यांनी या वेळी केले. प्रसंगी स्वाभिमानी नेते पंडित ओव्हाळ, वशिष्ठ लांडगे , बालासाहेब शिंदे, वैजनाथ गडसिंग , विलास पाईकराव , भास्कर पौळ यांची भाषणे झाली तर या बैठकीस चंद्रकांत टाकणखार , विशाल ससाणे , विश्वनाथ तोडके , सुरेश साळवे , सय्यद अनवर, साहेबा टाकणखार , गोपाळ नाईकनवरे , बाळू साळवे धम्मानंद गावडे , कन्हैया बनगे , बाबासाहेब पोटभरे , गौतम सोनपसारे, श्रीधर डोंगरे , राहुल मस्के , शेख अर्शद , रियाज कुरेशी , राजेश टाकणखार , बालासाहेब भालेराव , सोनाजी कदम , नाना गडसिंग , विलास खळगे , भारत डावरे , ज्ञानबा मस्के , बबन भालेराव , सुबोध गायसमुद्रे आदी सदस्यांची उपस्थिती होती.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com